दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# महाराष्ट्र सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)
लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक), किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर ॥ वर्ष ६ वे ॥ अंक १९५ ॥ रविवार १२ जुलै २०२६ ॥ RNI No.MAHMAR/2014/54581 ॥ Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 ॥ पाने ४ किंमत २ रुपये ॥

# पावसाळ्यात उन्हाळा सुरू; गर्मीमुळे मुंबईकर हैराण

मुंबई : गेल्या दोन आठवड्यांपासून महाराष्ट्रात धुमाकूळ घालणा-या पावसाने आता काहीशी उसंत घेतली आहे. मुसळधार पावसामुळे राज्यातील अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले, तर शेती, रस्ते आणि घरांचे मोठे नुकसान झाले. विशेषत: पालघर, नाशिक, पुणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यांना पावसाचा सर्वाधिक फटका बसला. मात्र आता पावसाचा जोर कमी झाल्याने अनेक भागांत उष्ण व दमट वातावरण जाणवू लागले असून मुंबईकरांना पुन्हा उकाड्याचा सामना करावा लागत आहे.राज्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसानंतर आता पावसाचा जोर लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. बहुतांश भागांत पावसाने विश्रांती घेतली असून पुढील काही दिवस उघडीप कायम राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी पडू शकतात. आज राज्यातील काही भागांसाठी यलो अलर्ट



कायम असून पुणे, सातारा आणि घाटमाथा परिसरात अधूनमधून पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दोन ते तीन दिवसांनंतर पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढू शकतो.गेल्या आठवड्यात कोकणात मुसळधार पावसाने मोठा कहर केला होता. मात्र आता परिस्थिती तुलनेने शांत झाली आहे. पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यांत हलक्या सरींचा अंदाज आहे, तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. घाटमाथा परिसरात आधीच मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मुंबईत गेल्या काही दिवसांतील मुसळधार पावसानंतर आता पावसाचा जोर कमी झाला आहे. गुरुवारपासून शहर आणि उपनगरांत पावसाने विश्रांती घेतली असून पुढील काही दिवस हलक्या सरींचा अंदाज आहे. मात्र उष्ण आणि दमट हवामानामुळे उकाड्यात वाढ झाली असून नागरिकांना घामाच्या त्रासाचा सामना करावा लागत आहे.

उत्तर महाराष्ट्रात ऊन-पावसाचा खेळ

धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता कायम आहे. नाशिकच्या घाटमाथ्यावर काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. इतर भागांत मात्र ढगाळ वातावरणासोबत अधूनमधून उन्हाचा तडाखाही जाणवू शकतो.

पश्चिम महाराष्ट्रात तुरळक सरी

पुणे, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता असून घाटमाथ्यावर मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळू शकतात. सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत मात्र कोरडे वातावरण राहण्याचा अंदाज आहे.

मराठवाड्यात उकाडा वाढण्याची शक्यता

छत्रपती संभाजीनगर, जालना आणि हिंगोली येथे हलक्या पावसाचा अंदाज असला तरी परभणी, बीड, नांदेड, लातूर आणि धाराशिवमध्ये पुढील काही दिवस कोरडे वातावरण राहू शकते. पावसाने विश्रांती घेतल्याने तापमानात वाढ होऊन उकाडाही वाढण्याची शक्यता आहे.

विदर्भात पावसाची प्रतीक्षा

अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत पुढील काही दिवस पावसाची शक्यता अत्यल्प आहे. समाधानकारक पाऊस न झाल्याने अनेक शेतकरी दुबार पेरणीच्या प्रतीक्षेत असून मान्सून पुन्हा सक्रिय होण्याकडे त्यांचे लक्ष लागले आहे.

## नवी मुंबई विमानतळ नामकरण आंदोलनाला तीव्र वळण; रश्मिता पोपेटासह ३०० आंदोलकांवर गुन्हे

पनवेल : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला बुधवारी तीव्र वळण लागले. पोलिसांनी परवानगी नाकारलेली असतानाही काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान आंदोलक आणि पोलिसांमध्ये धक्काबुक्की झाल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी आंदोलनकर्त्या रश्मिता राम पोपेटा यांच्यासह सुमारे २०० ते ३०० पुरुष व महिला कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



दिबाप्रेमी नामकरण समितीच्या वतीने रश्मिता पोपेटा यांनी चिंचपाडा येथे नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी पाच दिवसांचे आमरण उपोषण सुरू केले होते. प्रकृती खालावल्याने त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाही त्यांनी उपोषण कायम ठेवले.

बुधवारी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हजारो प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्र, महिला, तरुण आणि विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते पनवेल येथे एकत्र आले. सकाळी सुमारे ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून विधानभवनाकडे मोर्चा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. पोलिसांनी मोर्चा विनापरवाना व बेकायदेशीर असल्याचे सांगत आंदोलकांना पांगण्याचे आवाहन केले. मात्र, आंदोलकांनी चौकात ठिय्या आंदोलन सुरू केल्याने परिसरात वाहतुकीची मोठी कोंडी झाली.


त्यानंतर पोलिसांनी कायदेशीर कारवाईचा इशारा दिल्यानंतर काही आंदोलक आक्रमक झाल्याने दोन्ही बाजूंमध्ये धक्काबुक्की झाली. अखेर पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले. या प्रकरणी रश्मिता राम पोपेटा, आदित्य पोपेटा, अवंतिका पोपेटा, कांतीलाल कडू आणि अन्य आंदोलकांविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणणे, जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणे आदी आरोपांखाली भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांवर आक्षेपार्ह टिप्पणी, न्यायमूर्तींसमोर गोंधळ

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान एका वकिलाने न्यायालयीन शिष्टाचाराचे उल्लंघन करत न्यायमूर्तींसमोर अभूतपूर्व गोंधळ घातल्याची घटना घडली. सुनावणी सुरू असताना संबंधित वकिलाने न्यायमूर्तींनाच आदेश देण्याचा प्रयत्न केला, न्यायमूर्तींच्या दिशेने कागदपत्रे भिरकावली आणि सरन्यायाधीशांचा उल्लेख करत आक्षेपार्ह भाषा वापरल्याने न्यायालयात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.मिळालेल्या माहितीनुसार, प्रबल प्रताप नावाचा वकील स्वतःच्याच याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडत होता. ही याचिका इलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाविरोधात दाखल करण्यात आली होती. सुनावणी सुरू होताच संबंधित वकिलाने युक्तिवाद करण्याऐवजी थेट न्यायालयालाच आदेश देण्याची भूमिका घेतली. 'एसीपी, लखनऊ यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याचे आदेश द्या,' असे म्हणत त्याने न्यायालयाशी असामान्य पद्धतीने संवाद साधण्याचा प्रयत्न केला.या वक्तव्यानंतर खंडपीठावरील न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांनी, 'तुम्ही आम्हालाच आदेश देत आहात का?' असा प्रश्न दोन वेळा उपस्थित केला. मात्र, त्यानंतरही संबंधित वकिलाने आपली भूमिका न बदलता, 'माझ्याकडून एवढेच, सर्व काही रेकॉर्डवर आहे,' असे म्हणत हातातील कागदपत्रे न्यायमूर्तींच्या दिशेने भिरकावली. त्यानंतर त्याने सरन्यायाधीशांचा उल्लेख करत आक्षेपार्ह शब्दांचा वापर केल्याचे सांगण्यात आले.घटनेमुळे न्यायालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी संताप व्यक्त करत संबंधित वकिलाला तत्काळ न्यायालयाबाहेर काढण्याचे निर्देश दिले. विशेष म्हणजे, या सुनावणीचे थेट प्रक्षेपण सुरू असल्याने संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. दरम्यान, न्यायालयाने संबंधित वकिलाविरोधात अवमानाची किंवा अन्य दंडात्मक कारवाई न करण्याचा निर्णय घेतला. न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांनी निरीक्षण नोंदवताना, संबंधित वकील मानसिकदृष्ट्या त्रस्त आणि हतबल असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्याच्याविषयी सहानुभूती बाळगत न्यायालय त्याच्याविरोधात कठोर कारवाई करणार नसल्याचे स्पष्ट केले. मात्र, त्याची याचिका फेटाळून लावण्यात आली. न्यायालयासारख्या सर्वोच्च न्यायिक संस्थेत घडलेल्या या अभूतपूर्व घटनेची कायदेवर्तुळात आणि न्यायालयीन क्षेत्रात मोठी चर्चा सुरू असून, न्यायालयीन शिस्त आणि वकिलांच्या आचारसंहितेबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## आरबीआयचे नवे मध्यवर्ती कार्यालय नरिमन पॉइंटला; १५८६ कोटी रुपये खर्च

मुंबई - भारतीय रिझर्व्ह बँकेने नरिमन पॉइंट येथे नवीन मध्यवर्ती कार्यालय टॉवरच्या बांधकामाची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च १,५८६ कोटी रुपये आहे.




मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून गेल्या वर्षी विकत घेतलेल्या जमिनीवर हा टॉवर उभारला जाणार आहे. हा व्यवहार शहरातील सर्वात मोठ्या शासकीय-ते-शासकीय रिअल इस्टेट व्यवहारांपैकी एक होता.आरबीआयच्या मालमत्ता विभागाने जारी केलेल्या निविदा सूचनेनुसार, ही निविदा आरबीआयच्या पॅनेलवर असलेल्या डिझाईन आणि बिल्ड बांधकाम संस्थांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून, केंद्रीय बँकेने 'स्टेज-१' संकल्पना डिझाइन सादर करण्याची मुदत १३ जुलैपर्यंत वाढवली आहे.या प्रकल्पाला 'नरिमन पॉइंट येथे भारतीय रिझर्व्ह बँकेसाठी नवीन मध्यवर्ती कार्यालय इमारतीचा विकास' असे नाव देण्यात आले आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ६० महिन्यांचा कालावधी निश्चित केला आहे. बोली लावणाऱ्या कंपन्यांना ३१.७२ कोटी रुपयांची इसारा रक्कम जमा करावी लागेल, तर कामगिरी सुरक्षा मंजूर कंत्राट रकमेच्या ५ टक्के निश्चित करण्यात आली आहे. बोलीच्या पहिल्या टप्प्यांतर्गत, सहभागी संस्थांना तीन संकल्पना डिझाइन्स सादर करावे लागतील. आरबीआय प्रत्येक बोलीदाराकडून एका संकल्पनेला मंजुरी देईल, त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात सविस्तर तांत्रिक आणि आर्थिक बोली मागवल्या जातील. हा आगामी टॉवर मुंबईच्या सेंट्रल बिझनेस डिस्ट्रिक्टमधील सर्वात प्रमुख आकर्षण राहील.

## लाडकी बहीण योजनेत तब्बल ३५०० कोटींचा जादा खर्च; 'कॅग'च्या खुलाशाने सरकार अडचणीत?

मुंबई :मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या खर्चाबाबत नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी केलेल्या निरीक्षणांमुळे राज्य सरकारसमोर अनेक आर्थिक प्रश्न उभे राहिले आहेत. २०२४-२५ या आर्थिक वर्षात या योजनेवर मंजूर तरतुदीपेक्षा तब्बल ३,५४१.१६ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. या वाढीव खर्चामागील कारणांबाबत संबंधित विभागाकडून समाधानकारक माहिती उपलब्ध करून देण्यात आली नसल्याची नोंदही करण्यात आली आहे.




अहवालानुसार, महिला व बालविकास विभागासाठी सुरुवातीला २६,२००कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर 'लेक लाडकी' योजनेतील ३,४९०.७५ कोटी रुपये या योजनेकडे वळवण्यात आले. त्यामुळे उपलब्ध निधीची रक्कम २९,६९३.०९ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. मात्र, प्रत्यक्ष खर्च ३३,२३७.२४ कोटी रुपये इतका झाल्याने मोठ्या प्रमाणात अतिरिक्त आर्थिक भार पडल्याचे समोर आले आहे.

कॅगने सांगितले आहे की, अशा मोठ्या थेट लाभ हस्तांतरण योजनांसाठी निधीचे नियोजन करताना लाभार्थ्यांची संख्या, निधीची आवश्यकता आणि संभाव्य खर्च यांचे अधिक अचूक मूल्यमापन होणे आवश्यक आहे. अन्यथा वारंवार अतिरिक्त निधीची गरज निर्माण होऊन आर्थिक व्यवस्थापनावर परिणाम होऊ शकतो.

अहवालात आणखी एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत सुमारे १५,५८६ कोटी रुपये काढून ते व्हर्च्युअल पर्सनल डिपॉझिट अकाउंटस्मध्ये ठेवण्यात आल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. तातडीची आवश्यकता नसताना निधी अशा खात्यांमध्ये ठेवणे हे अर्थसंकल्पीय शिस्तीच्या तत्त्वांशी विसंगत असल्याचे कॅगने म्हटले आहे.

महिला कल्याणासाठीचा खर्च २०२३-२४ मधील २६१.७८ कोटी रुपयांवरून २०२४-२५ मध्ये ३३,५५४.३६ कोटी रुपयांपर्यंत वाढल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. हा खर्च महिलांना थेट आर्थिक मदत देण्यासाठी उपयुक्त ठरला असला, तरी गृहनिर्माण आणि इतर सामाजिक पायाभूत सुविधांवरील खर्चात घट झाल्याने भविष्यातील विकासकामांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याची चिंता कॅगने व्यक्त केली आहे.

सूर्योदय

रविवार १२ जुलै २०२६

संपादकीय

## लोकसंख्येबाबत जागरूकता महत्त्वाची

आज आपण ३९ व्या जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त वाढत्या लोकसंख्येसंबंधित गंभीर समस्यांबद्दल देशात जागरूकता निर्माण करण्यासाठी पथनाट्य, व्याख्याने, घोषवाक्य, निबंध स्पर्धा, पोस्टर्स लावणे व जनजागृतीसाठी रॅली काढणे अशा विविध कार्यक्रमांनी जनजागृती केली जाणार आहे. मुख्य उद्देश आहे की, देशातील वाढती लोकसंख्या आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे तसेच कुटुंब नियोजन आणि माता आरोग्याबाबत लोकांना शिक्षित करणे होय. त्यामुळे लोकसंख्येबाबत जागरूकता आजही महत्त्वाची आहे. आज लोकसंख्येच्या बाबतीत आपला देश जगात नंबर वन झाला असला तरी ज्या प्रमाणात लोकसंख्येबाबत जागरूकता व्हायला पाहिजे त्या प्रमाणात झालेली दिसत नाही. त्याला कारण आपण सर्वजण आहोत. केवळ लोकसंख्या दिन साजरा करून चालणार नाही तर खऱ्या अर्थाने लोकांमध्ये वाढत्या लोकसंख्येबाबत जागरूकता निर्माण करावी लागेल. जागतिक लोकसंख्या वेगाने वाढत असल्यामुळे आपल्या समोर आव्हाने निर्माण होत आहेत. याचा परिणाम नागरिकांच्या गरजांवर होतो. मानवाच्या गरजा अमर्यादित व साधने मर्यादित हे आपण अर्थशास्त्रात शिकलो आहोत. याचा परिणाम आपल्या विकसनशील देशामध्ये दिसून येतो. त्यासाठी लोकसंख्या शिक्षणाची खरी गरज आहे.

माता आरोग्य सेवा, गर्भनिरोधक साधने आणि आरोग्यविषयक उपक्रमांची उपलब्धता सुधारण्यासाठी शासनस्तरावर काटेकोरपणे नियमांची अंमलबजावणी झाली पाहिजे. म्हणजे यातूनच वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण येऊ शकते. असे असले तरी वाढत्या लोकसंख्येमुळे मानवी आरोग्य आणि पर्यावरणावर परिणाम होताना दिसतात.

आरोग्य सेवेचा विचार करता दवाखान्यात गर्दी होते. गर्दी झाल्याने उपचारासाठी विलंब होतो. विलंब झाल्याने अत्यावश्यक सेवा वेळीच मिळत नाही. याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्य सेवेवर ताण पडल्याने अत्यावश्यक सेवा असुरक्षित ठरतात. यामुळे आरोग्यसेवा, पोषण आहार व लसीकरण वेळेवर होत नाही. म्हणजे वाढत्या लोकसंख्येमुळे आरोग्य सेवेची कमतरता भासते. यात माता आणि मुलांकडे दुर्लक्ष होते. तसेच अस्वच्छता दिसून आल्याने संसर्गजन्य रोगाचा प्रसार वाढू शकतो. मुख्य म्हणजे लोकसंख्या वाढल्यामुळे स्वच्छ पाणी, अन्न आणि ऊर्जा यांची मागणी वाढते. ज्यामुळे आधीच मर्यादित असलेल्या संसाधनांवर ताण पडतो. वाहने, कचरा आणि औद्योगिक क्रिया प्रकल्प वाढल्याने हवा आणि जलप्रदूषण होते याचा दीर्घकालीन परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होतो. लोकांच्या निवाऱ्यासाठी आणि पायाभूत सुविधांसाठी जंगले तोडली गेल्याने पर्यावरणाचा समतोल बिघडतो. म्हणजे निसर्गाचा ऱ्हास होत असतो. तेव्हा लोकसंख्या वाढीवर आळा घालण्यासाठी आणि आरोग्याच्या सेवेत सुधारणा करण्यासाठी कुटुंब नियोजन व प्रजनन आरोग्य शिक्षण महत्त्वाचे आहे. यामुळे आपल्याला किती मुले असावीत याची जाणीव निर्माण झाल्याने ते स्वतः निर्णय घेऊ शकतात.

कुटुंब नियोजनामुळे आर्थिक स्थिरता वाढण्यास मदत होते, याचा परिणाम कौटुंबिक वातावरण अधिक निरोगी रहाते. तेव्हा लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. यामुळे लोकसंख्येचा विकास सर्वसमावेशक व पर्यावरणाचे रक्षण होण्याला मदत होते. यासाठी दारिद्र्य निर्मूलन, उत्तम आरोग्य, दर्जेदार शिक्षण, स्वच्छ पाणी, लिंग भेद आणि वातावरण या उद्दिष्टांची योग्यप्रकारे पूर्तता करावी लागेल.

जगाची लोकसंख्या अंदाजे ८.३० अब्ज असून संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार सध्याचा जागतिक लोकसंख्या वाढीचा दर ०.८३ टक्के दरवर्षी आहे. आपल्या भारत देशाची लोकसंख्या अंदाजे १.४७ अब्ज असून महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या अंदाजे १२.९३ कोटी आहे. तेव्हा देशातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता लोकसंख्या वाढीवर नियंत्रण झालेच पाहिजे. त्यासाठी कुटुंब नियोजन सेवांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. तरुणाईला त्यांचे हक्क, त्यांची जबाबदारी आणि त्यांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी यासाठी प्रजनन आरोग्य शिक्षण देण्यात यावे. महिलांना प्रजनन आरोग्याविषयी शिक्षण देऊन विवाह उशिरा करण्यासाठी प्रोत्साहन देणे,

छोटे कुटुंब सुखी कुटुंब यासाठी शासन पातळीवर आर्थिक प्रोत्साहन देणे, महिलांबरोबर पुरुषांचा सुद्धा कुटुंब नियोजनात सहभाग करून घ्यावा.


## रुग्णांना मोठा दिलासा! ३९ अत्यावश्यक औषधांच्या किमतींवर केंद्र सरकारची मर्यादा

मुंबई (प्रतिनिधी):उच्च रक्तदाब (बीपी), मधुमेह, हृदयविकार, तसेच डोळ्यांच्या संसर्गावरील औषधे घेणाऱ्या लाखो रुग्णांसाठी




केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. सरकारने ३९ अत्यावश्यक औषधांच्या कमाल किरकोळ किंमती निश्चित केल्या असून, यापुढे ही औषधे सरकारने ठरवलेल्या दरापेक्षा अधिक किमतीत विकता येणार नाहीत.राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरण मार्फत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. औषधांच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य रुग्णांवर पडणारा आर्थिक भार कमी करण्याच्या उद्देशाने हा निर्णय लागू करण्यात आला आहे. या निर्णयामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, आणि डोळ्यांच्या संसर्गावरील उपचार अधिक परवडणारे होणार असून, रुग्णांना आवश्यक औषधे वाजवी दरात उपलब्ध होतील. सरकारच्या या निर्णयाचे रुग्ण आणि आरोग्य क्षेत्रातून स्वागत करण्यात येत आहे.

## मुंबईकरांसाठी महत्त्वाची सुविधा! उघडे किंवा तुटलेले मॅनहोल दिसताच वर करा तक्रार



मुंबई (प्रतिनिधी):मुंबईतील उघडे, तुटलेले किंवा गायब झालेल्या मॅनहोलमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नागरिकांना अशा धोकादायक मॅनहोलची त्वरित माहिती देता यावी यासाठी पालिकेने स्वतंत्र व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवा सुरू केली आहे.ङ्गङ्गयाअंतर्गत नागरिक ९३२४५००६०० या व्हॉट्सॲप क्रमांकावर उघडे, तुटलेले किंवा गायब मॅनहोलचे छायाचित्र आणि संबंधित ठिकाणाचे लोकेशन पाठवून तक्रार नोंदवू शकतात. तक्रार प्राप्त होताच संबंधित विभागाकडून तातडीने दखल घेऊन आवश्यक कारवाई केली जाणार आहे.ङ्गङ्गपावसाळ्यात मॅनहोलमुळे अपघात होण्याच्या घटना लक्षात घेता ही सेवा नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उपयुक्त ठरणार असून, अधिकाधिक नागरिकांनी या सुविधेचा वापर करून धोकादायक ठिकाणांची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन मुंबई महानगरपालिकेने केले आहे.

## खारपाडा येथे नदीत व खाडीत सिलिंडरचा पूर हजारो गॅस सिलिंडर पाण्यात वाहून आले जीव धोक्यात घालून सिलेंडर काढण्यासाठी नागरिकांची झुंबड चक्क बोटीने सिलेंडर काढले बाहेर

रा. जि. उ. उपसंपादक /मंगेश यादव :मुंबई गोवा महामार्गावर खारपाडा येथे खाडीच्या व नदीच्या वेगवान प्रवाहात अचानक हजारो गॅस सिलिंडर वाहून जात असल्याचे पाहायला मिळाले. पाण्याच्या प्रवाहात वाहून जाणारे हे सिलेंडर पाहून स्थानिक नागरिकांनी ते काढण्यासाठी एकच झुंबड केली होती. अनेकांनी चक्क छोट्या होड्या घेऊन जाऊन हे सिलेंडर काढले.

गढूळ पाण्यामध्ये हजारो गॅस सिलिंडर हेलकावे खात धरमतर खाडीच्या दिशेने पुढे वाहून जात होते. हे गॅस सिलेंडर रसायनी येथील एचपीसीएल कंपनीच्या आवारातून पातळगंगा नदीवाटे या खाडीत वाहून आल्याचा प्राथमिक अंदाज स्थानिक नागरिकांनी वर्तविला आहे.ङ्ग पाण्यातून हजारो सिलिंडर वाहून जात असल्याची बातमी परिसरात वाऱ्यासारखी पसरली आणि ही आगळीवेगळी लूट करण्यासाठी स्थानिक नागरिकांची खाडीकिनारी एकच गर्दी झाली.

पेण तालुक्यातील खारपाड्या पासून ते अगदी दादर गावापर्यंतच्या खाडी पात्रात सिलेंडर तरंगताना दिसत होते. हे सिलिंडर धरमतर खाडीच्या दिशेने पुढे सरकत होते. यावेळी गावातील तरुणांनी आणि नागरिकांनी जिवाची पर्वा न करता जमेल तसे हे सिलिंडर पाण्याबाहेर काढण्यास सुरुवात केली.ङ्ग काही साहसी नागरिकांनी तर चक्क आपल्या छोट्या बोटी आणि होड्या पाण्याच्या वेगवान प्रवाहात उतरवल्या. नदीच्या मध्यभागात जाऊन बोटीच्या सहाय्याने सिलिंडर ओढून ते होडीत जमा करण्याचे धाडस अनेक जण करत होते. होडीमध्ये एका वेळी अनेक सिलिंडर भरून ते किनाऱ्यावर आणले जात होते. तर काहीजण पुलावर उभे राहून सिलेंडर काढत होते. सिलिंडर हस्तगत करण्यासाठी लोकांमध्ये मोठी चढाओढ निर्माण झाली होती.ङ्ग या अजब घटनेची माहिती मिळताच परिसरातील वाहतूकदार आणि नागरिकांनी पुलावर आणि रस्त्यांच्या कडेला मोठी गर्दी केली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर गॅस सिलिंडर पाण्यात कसे आले आणि यामागे नेमका कोणाचा हलगर्जीपणा आहे, याचा शोध आता घेतला जात आहे.



## पूर ओसरला आता गढूळ व दूषित पाण्यामुळे पालीकरांचे आरोग्य धोक्यात नगरपंचायतीच्या सुस्त कारभारावर तीव्र संताप साधे जलशुद्धी औषधाचे वाटत नाही

रा. जि. उ. उप संपादक /मंगेश यादव : नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीनंतर अंबा नदीला आलेला पूर आता ओसरला असला, तरी पाली शहरात पाणीपुरवठ्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पूर ओसरल्यानंतर सध्या नागरिकांना थेट अंबा नदीतून प्रचंड दूषित आणि गढूळ पाण्याचा



पुरवठा होत असल्याने स्थानिकांसह अष्टविनायक तीर्थक्षेत्री येणाऱ्या हजारो भाविकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या गंभीर परिस्थितीवर नगरपंचायत प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पाली शहराला थेट अंबा नदीतून कोणतीही क्लोरीनायझेशन किंवा शुद्धीकरण प्रक्रिया न करता पाणीपुरवठा केला जातो. महापुरामुळे नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर चिखल, गाळ आणि जैविक कचरा वाहून आला आहे. त्यातच परिसरातील कंपन्यांचे रसायनयुक्त पाणी, शहराचे सांडपाणी आणि टाकला जाणारा कचरा यामुळे नदीचे पाणी कमालीचे दूषित झाले आहे. या पाण्यातून मोठी दुर्गंधी येत असून जलजन्य आजारांची टांगती तलवार नागरिकांवर आहे. वास्तविक पाहता, अशा परिस्थितीत नगरपंचायतीने नागरिकांना पाणी उकळून व गाळून पिण्याचे आवाहन करणे, तसेच पाणी शुद्धीकरणासाठी मोफत क्लोरीन किंवा औषधांचे वाटप करणे अपेक्षित होते. मात्र, जुलै महिना उजाडला तरी प्रशासनाने अशी कोणतीही पावले उचललेली नाहीत. या बेजबाबदार कारभाराबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पाली शहर प्रमुख विद्वेश आचार्य यांनी प्रशासनाविरोधात जोरदार संताप व्यक्त केला आहे.ङ्ग२७ कोटींची योजना लालफितीतङ्ग पालीची वाढती लोकसंख्या आणि येथे दररोज येणारे हजारो भाविक लक्षात घेता, शहरासाठी २७ कोटी रुपयांची शुद्ध पाणी पुरवठा योजना मंजूर झाली आहे. मात्र, ही योजना अद्यापही तांत्रिक मंजुरीच्या कारणास्तव लालफितीत अडकली आहे. परिणामी, शुद्धीकरणाविना थेट पाणी पुरविले जात असल्याने नागरिकांच्या नळांतून अनेकदा चिखल, किडे आणि जिवंत साप बाहेर येण्याचे अत्यंत धक्कादायक प्रकार घडले आहेत. ही योजना कधी पूर्ण होणार, असा सवाल आता जनता विचारत आहे.

## प्राथमिक आरोग्य केंद्र कोळवली येथे जन आरोग्य समितीची सभा उत्साहात संपन्न

आबलोली (संदेश कदम)ङ्गगुहागर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र कोळवली येथे जन आरोग्य समितीची सभा उत्साहात संपन्न झाली. या सभेला जि.प.चे कृषी व पशुवर्धन, दुग्ध विकास समिती सभापती तथा जन आरोग्य समिती अध्यक्ष महेश नाटेकर, गुहागरचे उपसभापती निलेश सुर्वे, पंचायत समिती सदस्या सौ .सुचित्रा घाणेकर, तालुका आरोग्य अधिकारी तथा सह अध्यक्ष डॉ. घनश्याम जांगीड, श्रीमती. प्रियांका सुर्वे, नितीन गंगावन, गणेश कुलकर्णी, अनंत गावडे, प्रदीप सुर्वे यांच्या सह जन आरोग्य सदस्य, डॉ. प्रणाली जाधव तसेच आरोग्य सहाय्यक, कर्मचारी वृंद बहुसंख्येने उपस्थित होते.ङ्ग या सभेदरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्राच्या केंद्राच्या विविध आरोग्यविषयक कामाचा आढावा घेण्यात आला. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. घनश्याम जांगीड यांनी जन आरोग्य समितीची रचना, कार्यक्षेत्र, नीधी




विनीयोग, कर्तव्य आणि जबाबदारी याबद्दल महत्वपूर्ण माहिती आरोग्य देऊन आरोग्य केंद्रा बाबत दिल्या जाणाऱ्या रुग्णसेवेचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना, सुविधा व सेवा गुणवत्तेबाबत सखोल चर्चा करण्यात आली. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत आणि कर्मचारी निवासस्थाने गळती आणि दुरुस्ती बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणाली जाधव यांनी सर्वांचे आभार मानले

## शाश्वत विकासासाठी लोकसंख्या नियोजनाची गरज : डॉ. गणेश मांगडे

### वराडकरबेलोसे कनिष्ठ महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम

दापोली, दि. ११ जुलै : वराडकरबेलोसे कनिष्ठ महाविद्यालय, दापोली येथील राष्ट्रीय सेवा योजना () विभागाच्या वतीने ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात लोकसंख्या वाढ, लोकसंख्या नियोजन, आरोग्यदायी कुटुंब व्यवस्था आणि शाश्वत विकास या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.ङ्ङकार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प अधिकारी प्रा. बी. बी. ढवळे यांनी केले. प्रमुख व्याख्याते डॉ. गणेश मांगडे यांनी जागतिक लोकसंख्या दिनाचे महत्त्व, वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणारी सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय आव्हाने तसेच लोकसंख्या नियंत्रणासाठी जनजागृतीची आवश्यकता याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.ङ्ङकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. एफ. के. मगदूम हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांनी लोकसंख्या विषयक जनजागृतीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन समाजात सकारात्मक संदेश





पोहोचविण्याचे आवाहन केले.ङ्ङकार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मानसी कोवळे यांनी केले, तर प्रा. व्ही. एम. वळवी यांनी आभार मानले.ङ्ङसदर कार्यक्रम मा. प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## केंद्रशाळा निवळी नं.१ ची कु.स्वरा कोदारे शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता यादीत

उपसंपादक प्रदीप पवार

फेब्रुवारी मध्ये इयत्ता ५ वी साठी घेण्यात आलेल्या पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जि.प. आदर्श केंद्रशाळा निवळी नं.१ या शाळेची विद्यार्थिनी कु.स्वरा सचिन कोदारे हिने गुणवत्ता यादीत येऊन यश संपादन केले आहे. या परीक्षेत कु.स्वरा सचिन कोदारे हिने चिपळूण तालुका ग्रामीण सर्वसाधारण गटातून गुणवत्ता यादीत ८ वा क्रमांक तसेच जिल्हा गुणवत्ता यादीत ५६ वा क्रमांक प्राप्त केला. या परीक्षेसाठी स्वराला वर्गशिक्षक विकास दत्ताराम महाडिक, परीक्षा विभाग प्रमुख रविंद्र



गोपाळ जोंधळे , रामकिसन शेकडे तसेच संजय लवंदे यांनी वर्षभर नियोजनबद्ध पद्धतीने विशेष मार्गदर्शन केले. या यशात मुख्याध्यापक संदीप गायकवाड यांची प्रेरणा ही महत्त्वाची होती असे मार्गदर्शक शिक्षकांनी यावेळी सांगितले. या यशामुळे केंद्रप्रमुख दिगंबर सुर्वे, मुख्याध्यापक संदिप गायकवाड आणि मार्गदर्शक विकास महाडिक यांच्या बक्षिसांची ती मानकरी ठरली. स्वराच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. यापूर्वीही तिने प्रज्ञा शोध परीक्षा, मंथन परीक्षा आणि गुरूकुल परीक्षेत उज्वल यश प्राप्त केले होते. तिला शाळेतील मार्गदर्शक शिक्षकांबरोबर वडील सचिन शांताराम कोदारे, आई सानिका कोदारे यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले. कुमारी स्वराच्या या यशाबद्दल शरदजी शिगवण (पं. स. सदस्य), निवळीच्या सरपंच रेश्मा शिगवण, उपसरपंच मनोज डिके, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मिलिंद डिके, उपाध्यक्ष निलेश बांद्रे, केंद्रप्रमुख दिगंबर सुर्वे, शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्य, सर्व पालक यांनी अभिनंदन केले आहे.

## आनंददायी शनिवार उपक्रमातून रानभाज्या व औषधी वनस्पतींच्या वैभवाचा अनोखा परिचय

## प्राथमिक शाळा पोफळीतील प्रदर्शनाने विद्यार्थ्यांसह पालकांनाही दिला निसर्गसंवर्धनाचा संदेश

शिरगाव प्रतिनिधी : आधुनिक जीवनशैलीच्या वाढत्या प्रभावामुळे विस्मृतीच्या पडद्याआड जात असलेल्या पारंपरिक रानभाज्या आणि औषधी वनस्पतींची ओळख नव्या पिढीला करून देत त्यांच्या आरोग्यदायी महत्त्वाची जाणीव करून देणारा एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम आनंददायी शनिवार अंतर्गत शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी परशुराम एज्युकेशन सोसायटी, चिपळूण संचलित प्राथमिक शाळा पोफळी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शाळेचा परिसर अक्षरशः हिरवाईने नटला होता, तर प्रदर्शन पाहणाऱ्या प्रत्येकाच्या मनात निसर्गप्रेम आणि आरोग्याविषयीची जागरूकता निर्माण झाली.ङ्ङइयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या सहकार्याने परिसरातील टाकळा, भारंगी, अळू, कुर्डू, पेवा, फोडशी, कवळा, आकूर, कुड्याच्या शेंगा, सुरण, काटल, दिंडी, पथरी, आरवी,साबुदाणा,अशा सुमारे ३० ते ३५ प्रकारच्या रानभाज्या तसेच तुळस, अडुळसा, दुर्वा, कोरफड, कडुनिंब, पेरू यांसारख्या अनेक औषधी वनस्पती प्रदर्शनात मांडल्या होत्या. प्रत्येक वनस्पतीची माहिती, उपयोग आणि पौष्टिक मूल्य विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने उपस्थितांना सांगितल्याने प्रदर्शन अधिकच आकर्षक ठरले.ङ्ङमाध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सोनल गमरे यांच्या हस्ते फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबरोबरच जीवनोपयोगी ज्ञान देणाऱ्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.ङ्ङशाळेचे पालक तसेच पत्रकार मुनीर शेख,माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. सुवार वहिनी,संगीता शिर्के यांनी प्रदर्शनाला भेट देऊन, ''विद्यार्थ्यांना निसर्गाशी जोडणारे आणि पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे जतन करणारे असे उपक्रम काळाची गरज आहेत,'' असे गौरवोद्गार काढले.ङ्ङउपस्थित




पालकांनीही या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत, आजच्या पिढीला रानभाज्या व औषधी वनस्पतींची ओळख करून देण्याचे हे अत्यंत स्तुत्य कार्य असल्याचे सांगितले. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये आरोग्यदायी आहाराच्या सवयी रुजण्यास मदत होईल, तसेच आपल्या समृद्ध ग्रामीण परंपरेचे संवर्धनही होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.ङ्ङशाळेचे मुख्याध्यापक श्री. महेंद्र कापडी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.त्यांनी विद्यार्थ्यांना रानभाज्यांमधील लोह, खनिजे, प्रथिने, जीवनसत्त्वे आणि इतर पोषकतत्त्वांचे महत्त्व पटवून दिले. ''निरोगी शरीरातच सुदृढ, सुसंस्कारी आणि सर्जनशील मन वास करते,'' हा संदेश देत त्यांनी रानभाज्या नियमित आहाराचा अविभाज्य भाग बनविण्याचे आवाहन केले. तसेच औषधी वनस्पतींचे आयुर्वेदातील स्थान, त्यांचे औषधी गुणधर्म आणि दैनंदिन जीवनातील उपयोग याविषयीही सविस्तर मार्गदर्शन केले.ङ्ङया प्रदर्शनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे काही विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात आणलेल्या रानभाज्यांची विक्री करून त्यातून मिळालेली रक्कम शाळेला निधी म्हणून अर्पण केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, आर्थिक साक्षरता, व्यवहारज्ञान आणि श्रमाचे महत्त्व यांची जाणीव निर्माण झाली.ङ्ङशिशुविहार,प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी तसेच मोठ्या संख्येने उपस्थित पालकांनी प्रदर्शनाला भेट देऊन उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. ज्ञान, आरोग्य, निसर्गप्रेम आणि संस्कार यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमाने उपस्थितांच्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटवला. ग्रामीण भागातील पारंपरिक ज्ञानाची जपणूक करत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि स्वावलंबनाचे संस्कार रुजविणारा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.ङ्ङप्रदर्शन यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ शिक्षिका शिवानी शिंदे, प्रतिभा धुमाळ, अशोक मिसाळ,साधना गायकवाड, मनिषा नाईक, अक्षता साळवी, सरिता मानकर,पूजा लाड तसेच सर्व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा उपक्रम केवळ प्रदर्शन न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा संस्मरणीय शैक्षणिक सोहळा ठरला.

# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

शाळाबाह्य शिक्षकांची व्यथा

मुकी बिचारी कुणीही हाका अशीच अवस्था सध्या राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांची आहे. कोणत्याही सरकारी कामासाठी शासन अगदी हक्काने राज्यातील शिक्षकांना जुंपतात. देशस्तरावरची जनगणना असो,किंवा निवडणूक प्रक्रिया.किंवा आता बीएलओ आणि एस आर पी च्या नावाखाली राज्यातील तमाम शिक्षकांना अशैक्षणिक कामाच्या विळख्यात सरकारने अडकवले आहे. त्यामुळे शिक्षकांची




अवस्था हि शाळाबाह्य शिक्षक अशीच झालेली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याला आणि पर्यायाने राष्ट्राला घडविणाऱ्या शिक्षकांच्या या बिकट अवस्थेला कोण जबाबदार आहे?राज्यातील शिक्षकावरील हा अशैक्षणिक कामाचा अतिरिक्त बोजा संपणार आहे कि नाही?याच प्रश्नाच्या अनुषन्गाने शिक्षक महासंघ मुंबई आणि कोकण विभागाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांच्याशी साप्ताहिक संवाद.

१सध्याच्या शिक्षकांची अवस्था शाळाबाह्य शिक्षक अशी का झालेली आहे?

शिक्षक हे खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे आणि पर्यायाने राष्ट्र घडविणारे देशाचे आधारस्तंभ असतात. परंतु सरकार शालेय अभ्यासाच्या व्यतिरिक्त हक्काचे कामगार याच दृष्टिकोनातून शिक्षकांना कायम अतिरिक्त सरकारी कामासाठी वेठीस धरतात. जनगणना,निवडणूक प्रक्रिया अशा कामाव्यतिरिक्त आता सरकारने राज्यातील शिक्षकांना बीएलओ आणि एस आर आय च्या कामाकरिता अडकविले आहे. त्यामुळेच राज्यातील शिक्षक हे शाळाबाह्य कामामध्ये गुंतलेले असताना नवीन शैक्षणिक झाल्यानंतर देखील राज्यातील अनेक शाळा या शिक्षकाविनाच आहेत. या कामामुळे शिक्षक भरडले जात आहेत आणि दुसरीकडे शाळांमधील विद्यार्थ्यंचे देखील शैक्षणिक नुकसान होत आहे.

२राज्यातील शिक्षकांना टीईटी परीक्षा देखील सक्तीची केली आहे त्याबद्दल?

सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालानुसार देशभरातील सुमारे २५ लाख शिक्षकांना टीईटी परीक्षा देणे बंधनकारक केले गेले आहे. अर्थातच,जुन्या काळातील जे आता निवृत्तीच्या वयाकडे झुकलेले आहेत अशा शिक्षकावर हा अन्यायच आहे. या निर्णयापूर्वीचे शिक्षक हे डीएड आणि बीएड परीक्षा उत्तीर्ण करूनच सेवेत रुजू झालेले आहेत . मग अशा शिक्षकांना आता अतिरिक्त टीईटी कशाला?या परीक्षेत यूपीएससी एमपीएससी च्या धर्तीवर प्रश्न विचारले जात असल्याने निकाल देखील साधारण लागतो आणि शिक्षकांना कमी लेखले जाते. परिणामी समाजात आणि प्रसारमाध्यमामध्ये देखील शिक्षकांची प्रतिमा मालिन होते. नव्याने रुजू होणाऱ्या शिक्षकांना हि टीईटी असावी मात्र जुन्या शिक्षकांना यात वेठीस धरू नये असे वाटते.

३विधिमंडळात शिक्षकांचे प्रतिनिधी आहेत त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत?

शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडविणयासाठी विधान परिषदेमध्ये सात शिक्षक आणि सात पदवीधर प्रतिनिधी निवडून दिले जातात. या १४ शिक्षक व पदवीधर आमदाराकडून शिक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत. सभागृहात केवळ शिक्षकांचे प्रश्न मांडणे आणि टायच्या क्लिप्स व्हायरल करणे एवढ्यावरच त्यांची भूमिका मर्यादित राहता काम नये विधिमंडळ हे केवळ मांडण्याचे नवहे तर ते प्रश्न सोडविण्याचे सभागृह आहे. हे सर्व संबंधितांनी लक्षात ठेवणे गरजेचे आहे. शिक्षकांचा सन्मान राखत त्यांना अतिरिक्त अशैक्षणिक कामातून मुक्त करत त्यांना अध्यापनासाठी वेळसाधेन आणि वातावरण निर्माण करून देणे हीच काळाची गरज आहे.

२ नोंद

नोवो नॉर्डिस्क इंडियाने लाँच केले जगातील पहिले बेसल इन्सुलिन


नोवो नॉर्डिस्क इंडियाने आज भारतात अविक्लि - इन्सुलिन आयकोडेक लाँच केल्याची घोषणा केली. हे टाईप १ किंवा टाईप २ मधुमेह (डायबिटीज मेलिटस) असलेल्या प्रौढ व्यक्तींसाठी जगातील पहिले, आठवड्यातून एकदा घेण्याचे बेसल इन्सुलिन आहे. अविक्लि, मधुमेह असलेल्या रुग्णांसाठी इन्सुलिन घेण्याच्या पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणार आहे. म्हणजेच दररोज एकदा घ्याव्या लागण्याऐवजी आता आठवड्यातून फक्त एकदाच इंजेक्शन घ्यावे लागेल. यामुळे वर्षाला लागणारा ३६५ इंजेक्शन्सचा भार कमी होऊन तो केवळ ५२ वर येईल. हा केवळ एक छोटासा बदल नसून, इन्सुलिन लोकांच्या जीवनशैलीत कशा प्रकारे सहज सामावून जाऊ शकते याचे हे एक मूलभूत संशोधन आहे.-१ क्लिनिकल प्रोग्राममध्ये, रोज एक ग्लार्जिन १०० च्या तुलनेत अविक्लि ने अधिक परिणामी १ घट आणि टाईम इन रेंज मिळवून दाखवला. टाईप २ मधुमेह असलेल्या अधिक लोकांनी हायपोग्लायसेमियाचा त्रास न होता ७% पेक्षा कमी १ पातळी गाठली. टाईम इन रेंज- जे १ इतकेच महत्त्वपूर्ण आहे ते- अविक्लि मुळे लक्षणीयरीत्या वाढले, ज्यामुळे रुग्णांना दिवसभर अधिक चांगले नियंत्रण मिळाले.२

नोव्हो नॉर्डिस्क इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक विक्रांत श्रोत्रिय म्हणाले: ''अविक्लि चे लाँच हा भारतातील मधुमेह उपचारांमधील एक ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण क्षण आहे. एक शतकाहून अधिक काळापासून, नोव्हो नॉर्डिस्कने केवळ एकाच उद्दिष्टाचा ध्यास घेतला आहे: रुग्णांसाठी इन्सुलिन उपचार पद्धती अधिक सोपी, सुरक्षित आणि सहज उपलब्ध करणे. आठवड्यातून एकदाच डोस देणे हे आमच्या क्षेत्रातील दीर्घकाळापासूनचे एक स्वप्न होते. आज, ते भारतात प्रत्यक्षात आले आहे. आमचा असा विश्वास आहे की अविक्लि हे इन्सुलिन सुरू करण्यामधले मानसिक आणि शारीरिक अडथळे कमी करेल, आणि सरतेशेवटी अधिक लोकांना अधिक चांगले नियंत्रण आणि उत्तम जीवनमान मिळवण्यास मदत करेल.''

३ चला पर्यटनाला

कोकणातील निसर्गरम्य दापोली

कोकण हा महाराष्ट्रातील निसर्गसौंदर्याने नटलेला आणि पर्यटनासाठी प्रसिद्ध प्रदेश आहे. निळाशार समुद्रकिनारे, हिरव्यागार डोंगररांगा, ऐतिहासिक किल्ले, प्राचीन मंदिरे आणि स्वादिष्ट कोकणी खाद्यसंस्कृती यामुळे कोकण पर्यटकांना नेहमी आकर्षित करतो. शांत वातावरण आणि मनमोहक निसर्ग अनुभवण्यासाठी दरवर्षी हजारो पर्यटक येथे भेट देतात..रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दापोली हे शहर आहे. थंड हवामान, हिरवागार निसर्ग आणि समुद्रकिनारे यामुळे दापोलीला मिनी महाबळेश्वर असेही म्हटले जाते. सह्याद्री पर्वतरांग आणि अरबी समुद्र यांच्या मधोमध वसलेले हे शहर शांत आणि निसर्गरम्य वातावरणासाठी ओळखले जाते. कार्दे बीच, लाडघर बीच, मुरुड बीच आणि अंजर्ले बीच हे समुद्रकिनारे दापोली शहराजवळ आहेत. हे समुद्र किनारे स्वछ वाळू शांत समुद्र आणि सुंदर सूर्यास्ता साठी प्रसिद्ध आहेत. दापोलीमध्ये डॉल्फिन सफारी, बोटिंग आणि काही वॉटर स्पोर्ट्सचा आनंदही घेता येतो. तसेच, जवळच सुवर्णदुर्ग आणि केशवराज मंदिर यांसारखी ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळे आहेत. येथील कोकणी खाद्यपदार्थ पर्यटकांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. ताजे मासे, सोलकढी, कोकम सरबत आणि घरगुती कोकणी जेवण यांचा खास स्वाद येथे अनुभवायला मिळतो.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क –९८३३१४६३५६**
**इमेल –**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार १२ जुलै २०२६ 

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## “वृक्ष लावा, वृक्ष जगवा”चा संदेश देत समाज सेवेशी तत्पर चॅरिटेबल ट्रस्टचा स्तुत्य उपक्रम

श्रीवर्धन प्रतिनिधी सोपान निंबरे: पर्यावरण संवर्धनाचा वसा जपत गेली अनेक वर्षे सातत्याने सामाजिक कार्य करणाऱ्या समाज सेवेशी तत्पर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने यंदाही वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचा उपक्रम उत्साहात पार पडला. दिनांक ११ व १२ जुलै रोजी जसवली हायस्कूल, दांगुरी हायस्कूल आणि शिरवणे गाव येथे एकूण ९० विविध जातींच्या रोपांची लागवड करण्यात आली.ङ्कङ्कया उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ वृक्षारोपण न करता शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते रोपे लावून त्यांच्यामध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याने लावलेल्या रोपाच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारत “वृक्ष वाचवू, पर्यावरण जपू“ अशी शपथ घेतली. तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना वृक्षारोपण व संवर्धन प्रमाणपत्र देऊन त्यांच्या सहभागाचा गौरव करण्यात आला.ङ्कङ्कया उपक्रमासाठी दशरथ कातकर सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच महेश पवार, सुधीर राणे, अविनाश पारधी, दांगुरी हायस्कूलचे मुख्याध्यापक, जसवली हायस्कूलचे मुख्याध्यापक तसेच शिक्षक, ग्रामस्थ, विद्यार्थी आणि स्वयंसेवक यांचे उल्लेखनीय सहकार्य लाभले.ङ्कङ्कगेली अनेक वर्षे समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या समाज सेवेशी तत्पर चॅरिटेबल ट्रस्टचा हा पर्यावरणपूरक उपक्रम नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, “वृक्षारोपणापेक्षा वृक्षसंवर्धन अधिक महत्त्वाचे“ हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.




## आरडीसीसी बँकेतर्फे विशेष सत्कार

प्रमिलाजोशी (अलिबाग)
आरसीएफ माजी कर्मचारी परिषद संस्था गेली अकरा वर्षे सामाजिक बांधिलकी जपत विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवित आहे.वृद्धाश्रमात जाऊन ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी,औषधांचे वितरण,मतिमंद विद्यार्थ्यांना विविध प्रकारे मदत, कागदी पिशव्यांच्या निर्मितीस प्रोत्साहन, पर्यावरण पूरक उपक्रम, गरजूंना आर्थिक सहाय्य, विविध सामाजिक उपक्रमांद्वारे संस्थेने समाजसेवेचा आदर्श निर्माण केलेला आहे.याशिवाय नेत्रदान व देहदानाबाबत जनजागृती करुन समाजामध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना दृढ करण्याचे उल्लेखनीय कार्यही संस्थेमार्फत सातत्याने केले जात आहे . संस्थेच्या या उल्लेखनीय यशाचा गौरव करुन समाजापुढे एक प्रेरणादायी आदर्श उभा करण्याच्या उद्देशाने देशातील सहकारी क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या रायगड जिल्हा सहकारी बँकेतर्फे ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये विशेष सत्कार मा.जयंत भाई( चेअरमन रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक) यांच्या हस्ते करण्यात आला.पुष्पगुच्छ आणि प्रभू श्रीरामाची मूर्ती भेट देण्यात आली.याबद्दल रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे आभार.ङ्कसंस्थेतर्फे श्री.रवि वर्तक, श्री.श्रीनिवास पाटील, श्री.अभिमन्यू पाटील, श्री.रमेश म्हात्रे, श्री.मंगेश भगत, श्री.शरद देशमुख व श्री.राजन कुलकर्णी उपस्थित होते.



## राष्ट्रवादीचे पदाधिकारी लोकांचे प्रश्न समजून घेण्यासाठी आठवड्यातून पाच दिवस चिपळणूच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये उपस्थित राहणार

चिपळूण :- शनिवार दिनांक.११/०७/२०२६ रोजी चिपळूण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठक पाग कन्याशाळेच्या सभागृहामध्ये संपन्न झाली. या बैठकीमध्ये शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमासंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पूर परिस्थितीवर चर्चा करण्यात आली व कै. अजित दादा पवार यांची दिनांक.२२ जुलै २०२६ रोजी जयंती साजरी करण्यात येणार आहे, त्या अनुषंगाने सोमवार दिनांक.१३ जुलै पासून तालुक्यांमध्ये वृक्ष लागवड व वृक्ष वाटपाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. ङ्कशासकीय व निमशासकीय कार्यालयामध्ये जनतेचे प्रश्न सुटण्याकरिता काही अडचणी निर्माण झाल्यास तालुक्यातील आमदार शेखर निकम यांचे जनसंपर्क कार्यालय चिपळूण येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. व आठवड्यातून पाच दिवस पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी कार्यालय मध्ये उपस्थित राहून प्रश्न समजून घेणार आहेत. आठवड्यातून चार दिवस प्रांतिकचे उपाध्यक्ष शौकत भाई मुकादम, जयंद्रथ खताते, अबूशेठ ठसाले हे उपलब्ध होतील. व आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी पंचायत समितीचे सभापती सूर्यकांत भाई खेतले तसेच जिल्हा व पंचायत समितीचे सदस्य हे सुद्धा कार्यालय मध्ये उपस्थित राहणार आहेत. तालुक्याचे आमदार या सर्व विषया संबंधित आढावा घेऊन प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत.ङ्कआजच्या बैठकीमध्ये माजी सभापती शौकतभाई मुकादम यांनी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी संपर्क कार्यालय मध्ये उपस्थित राहून लोकांचे प्रश्न सोडवले पाहिजेत असा ठराव मांडला व तो सर्वांनी मान्य केला..ङ्कबैठकीच्या सुरुवातीला तालुका अध्यक्ष नितीन उर्फ अबुशेठ ठसाले यांनी प्रस्ताविक केले. या बैठकीला क्रांतीचे उपाध्यक्ष शौकत भाई मुकादम, सेक्रेटरी जयंद्रथ खताते, तालुका अध्यक्ष नितीन उर्फ अबुशेठ ठसाले, विधानसभा क्षेत्राध्यक्ष रमेश राणे, शहराध्यक्ष मिलिंद कापडी, दादासाहेब साळवी, दिशा दाभोलकर, महिला शहराध्यक्ष आदिती देशपांडे, महिला जिल्हा उपाध्यक्ष रवीना गुजर, आज पासून जे काही तालुकाध्यक्ष समीर काझी, माजी सरपंच दशरथ दाभोळकर, शहर सरचिटणीस मनोज जाधव, किसान चिपळूणकर, युवक तालुका अध्यक्ष निलेश कदम, पंचायत समिती सदस्य शौकत माखजनकर, शरद शिगवण, जिल्हा परिषद सदस्य संजय कदम,नेहा रहाटे आदी मान्यवर उपस्थित होते व शेवटी सेक्रेटरी जयंद्रथ खताते यांनी मार्गदर्शन करून बैठकीचे समारोप केले.





## पेण विधानसभा मतदार संघात SIR मॅपिंग चे काम जोरात सुरु

पेण प्रतिनिधी,
शासनाच्या विशेष सखोल पुर्ननिरीक्षण २०२६ कार्यक्रमांतर्गत पेण १९१ विधानसभा मतदार संघातील ग्रामपंचायत रोडे बूथ क्र. १६८ येथे आदिवासीवाडीवर बूथ अंतर्गत कॅम्प लावला होता. आदिवासी मतदार या शासनाच्या कार्यक्रमापासून वंचित राहू नये



तसेच सर्वांचे फॉर्म भरून व्हावे यासाठी ग्रामपंचायत रोडे येथील फणसवाडी आदिवासी वाडी येथे विशेष कॅम्प घेण्यात आला. अधिकारी व त्यांचे मदतनीस सहकारी, अंगणवाडीसेविका, शिक्षकवृंद, आशाताई यांनी स्वयंसहभाग घेऊन हा कार्यक्रम राबवीला. या कार्यक्रमासाठी सरपंच दिनेश पवार व भाजपा पक्षाचे २ म्हणून काम पाहणारे माजी सरपंच स्वप्नील म्हात्रे यांनी मेहनत घेतली. भविष्यात एकही मतदाराचे नाव मतदान यादीतून वगळले जाऊ नये यासाठी प्रयत्न चालू असल्याचे सांगितले. यानंतर राहिलेल्या आदिवासी लोकांचे घरोघरी जाऊन फॉर्म भरून घेऊ असं सांगितलं. यावेळी ग्रामस्थ व मतदार यांना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच मॅपिंग चे काम योग्य प्रकारे सुरु आहे की नाही हे पाहण्याकरिता पेण उपविभागीय अधिकारी प्रांत प्रवीण पवार साहेब यांनी भेट दिली. सोबत नायब तहसीलदार नितीन परदेशी साहेब व निवडणूक अधिकारी तुषार कामत साहेब यांनीही भेट देऊन व त्यांचे सहकारी यांना मार्गदर्शक सूचना दिल्या . तसेच फॉर्म भरताना येणाऱ्या अडचणी व त्यातून कसा मार्ग काढावा यासाठी मार्गदर्शन केले व पेण तालुक्यातील सर्व यांनी लवकरात लवकर आपलं मॅपिंगचे १००% उद्दिष्ट पूर्ण करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. आणि सर्व मतदारांना आव्हाहन केले की जर आपल्याला फॉर्म भरण्यासाठी काही अडचण निर्माण झाली आणि अधिकाऱ्याकडून समाधान नाही झालं तर थेट पेण तहसील कार्यालय येथील निवडणूक कक्षाशी संपर्क साधावा असं सांगितलं.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला शहराध्यक्षा, माजी नगरसेविका सौ.आदिती देशपांडे मॅडम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना महिला प्रदेश सरचिटणीस दिशा दाभोळकर

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला शहराध्यक्षा, माजी नगरसेविका सौ.आदिती देशपांडे मॅडम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना महिला प्रदेश सरचिटणीस दिशा दाभोळकर, महिला जिल्हा उपाध्यक्ष रविना गुजर, पूर्वा आहीरे, मीरा नारकर, तालुका अध्यक्ष नितीन(अबु) ठसाळे, पंचायत समिती सभापती सुरेशशेठ खेतले, प्रदेश उपाध्यक्ष शौकतभाई मुकादम, प्रदेश सरचिटणीस जयंत खताते, ज्येष्ठ नेते दादासाहेब साळवी, शहराध्यक्ष मिलिंद कापडी, माजी सरपंच दशरथ दाभोळकर, पंचायत समिती सदस्य शौकतभाई माखजनकर, शरद शिगवण, जिल्हा परिषद सदस्य नेहा राहटे, संजय कदम, विधानसभा क्षेत्राध्यक्ष रमेशजी राणे, पांडूशेठ माळी,अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष समीरभाई काझी, शहर सरचिटणीस मनोज जाधव, किसन चिपळूणकर, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष सचिन साडविलकर, आल्हाद यादव, प्रभाकर सैतवडेकर, खालीद पटाईत सचिन शिंदे आदि राष्ट्रवादी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



## एसटी स्थानकाच्या २०० मीटरमध्ये गाडी लावली तर थेट ‘जप्ती’

### आरटीओ, पोलिस व एसटी प्रशासन ॲक्शन मोडवर; रत्नागिरीत ₹४६,५०० चा दंड वसूल

रत्नागिरी प्रतिनिधी :रत्नागिरी जिल्ह्यात एसटी बस स्थानक परिसरात प्रवाशांची अवैध वाहतूक करणाऱ्या आणि वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या खासगी वाहन चालकांविरुद्ध प्रशासनाने कठोर कारवाई सुरू केली आहे. जिल्हा पोलिस, आरटीओ आणि एसटी प्रशासनाच्या संयुक्त मोहिमेत एसटी स्थानकाच्या २०० मीटर परिसरात नियमभंग करणारी खासगी वाहने आढळल्यास थेट जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.‘ऑपरेशन क्लीन’ मोहिमेचा दुसरा टप्पा १ जुलै ते १० जुलैदरम्यान अधिक प्रभावीपणे राबविण्यात आला. या कालावधीत रत्नागिरी जिल्ह्यात विविध खासगी वाहनांवर कारवाई करून ₹४६,५०० इतका दंड वसूल करण्यात आला.यापूर्वी ५ ते १५ जून या कालावधीत राबविण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यात ४४ वाहनांवर कारवाई करून ₹४६,६०० दंड वसूल करण्यात आला होता.ही कारवाई परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. प्रियांका नारनवरे यांच्या निर्देशानुसार पोलिस व आरटीओ प्रशासनाने संयुक्तपणे केली.या मोहिमेमुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात वाढ झाली असून, प्रवासी संख्येतही लक्षणीय वाढ झाल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. अवैध प्रवासी वाहतुकीवर आळा बसल्याने एसटी सेवेचा लाभ अधिकाधिक प्रवाशांना मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )